दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
www.raigadnagari.com
/ raigadnagari
वर्ष २० वे | अंक २६९ | MAHMAR/2006/17212 | रायगड | शनिवार, दि.२७ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## खारघरमधील हुक्का पार्लरवर छापा; मॅनेजरसह दोघांना अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तंबाखूजन्य पदार्थांचा वापर करून हुक्का पार्लर चालवण्यास कायद्याने बंदी असूनही खारघर येथील दि स्मोक कॅफेमध्ये सर्रासपणे बेकायदेशीर हुक्का पार्लर चालवले जात असल्याचे उघडकीस आले. खारघर पोलिसांनी या बेकायदेशीर हुक्का पार्लरवर छापा मारून मॅनेजरसह दोघांना अटक केली आहे. तसेच हुक्का ओढण्यासाठी लागणारे साहित्य व वेगवेगळ्या प्रकारचे फ्लेवर जप्त केले आहेत.

खारघर सेक्टर-३, बेलपाडा येथील दि स्मोक कॅफेमध्ये बेकायदेशीररीत्या हुक्का पार्लर सुरू असल्याची माहिती खारघर विभागाच्या सहाय्यक पोलीस आयुक्तांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक सुरज जाधव व त्यांच्या पथकाने छापा टाकून कारवाई केली. कॅफेचा मॅनेजर जियाद नासिर बहादुरकर आणि वेटर फहिम निजाम अहमद या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच दोघांना अटक केली आहे.

# खोपोली नगरसेवक पतीची हत्या; सात जणांवर गुन्हे दाखल

**दै.रायगड नगरी । खोपोली**

रायगड जिल्ह्यातील खोपोली येथे शिंदे गटाच्या शिवसेनेच्या नवनिर्वाचित नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती मंगेश काळोखे (४५) यांची शुक्रवारी, (दि. २६) सकाळी सात वाजता निर्घृण हत्या करण्यात आली. मंगेश काळोखे हे आपल्या मुलींना शाळेत सोडून घरी परतत असताना खोपोलीतील साईबाबा नगर परिसरात जया बारजवळ तलवार आणि चॉपरने अज्ञातांनी त्यांच्या डोक्यावर कोयता, कुऱ्हाड आणि तलवारीने सपासप वार करुन अक्षरशः चिंधड्या उडवल्या. हल्ल्यानंतर आरोपी फरार झाले आहेत. राजकीय वैमनस्यातून ही हत्या करण्यात आल्याचा संशय व्यक्त होत आहे. भरदिवसा घडलेल्या या हत्येच्या घटनेने खळबळ उडाली आहे. दरम्यान, मयत मंगेश काळोखे यांचा पुतण्या राज काळोखे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे रवींद्र देवकर यांची दोन मुले दर्शन आणि धनेश व त्यांचे अंगरक्षक तसेच खुनाच्या कटासाठी सहकार्य केल्याचा आरोप केल्याने राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, प्रवक्ता भरत भगत यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मंगेश काळोखे हे आपल्या मुलींना शाळेत सोडून घरी परतत होते. यावेळी एका अज्ञात वाहनातून चार ते पाचजण उतरले. त्यांनी मंगेश यांच्या गाडीसमोर स्वतःची गाडी आडवी घातली आणि त्यांच्यावर तलवारी व चॉपरने हल्ला केला. या भीषण हल्ल्यात मंगेश काळोखे यांचा जागीच मृत्यू झाला. या हत्येमागे राजकीय वादाची पार्श्वभूमी असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मानसी काळोखे या साईबाबा नगर प्रभागातून दुसऱ्यांदा निवडून आल्या आहेत. त्यांनी याच निवडणुकीत प्रतिस्पर्धी देवकर यांच्या पत्नीचा पराभव केला होता. काळोखे आणि देवकर या दोन कुटुंबांत आणि त्यांच्या पक्षांमध्ये गेल्या १५-२० वर्षांपासून वाद सुरू असल्याचे समजते. निकाला दिवशी देखील त्यांच्यात किरकोळ वाद झाला होता. काळोखे यांच्या नातेवाईकांनी पोलिसांवर गंभीर आरोप केले आहेत. गेल्या दोन दिवसांपासून मंगेश यांच्यावर पाळत ठेवली जात होती आणि एक संशयास्पद गाडी परिसरात फिरत होती. याबद्दल पोलिसांना कल्पना देऊनही त्यांनी दुर्लक्ष केले, असा आरोप नातेवाईकांनी केला आहे.

मंगेश काळोखे यांच्या हत्येची बातमी वाऱ्यासारखी पसरल्याने मोठा जनसमुदाय खोपोली शहरात दाखल झाला. दरम्यान, आरोपींना तात्काळ अटक करा, अशी मागणी खोपोलीकरांनी करून मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला आहे. ही घटना घडत असताना काळोखे यांना वाचविण्यासाठी मारेकऱ्यांना घाबरून कोणीही पुढे न आल्याने एक तरुण कार्यकर्ता सर्वांच्या मदतीला जाणारा मंगेश काळोखेचा राजकरणात बळी गेला असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. या घटनेने खोपोली शहर हादरून गेले आहे. आतापर्यंतच्या इतिहासात खोपोलीचे राजकारण इतक्या खालच्या थराला कधीही गेले नव्हते. मात्र, या घडनेने बीड जिल्ह्यात घडणाऱ्या घटनांचीच प्रचिती खोपोलीतील जनतेला आली.

या घटनेमुळे पोलीस प्रशासनही हादरले असून, या घटनेनंतर पोलीस अधीक्षक आचल दलाल, उपअधीक्षक अभिजित शिवथरे, गुप्तहेर खात्याचे जिल्हा निरीक्षक मिलिंद खोपडे यांनी खोपोली गाठून त्यांच्या आदेशानुसार खालापूर पोलीस उपविभागीय अधिकारी विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू केला आहे. तपास यंत्रणेसाठी फॉरेन्सिक लॅबची टीम घटनास्थळी दाखल झाली आहे. या घटनेला गावातील विरोधकच जबाबदार असल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे तपासाअंती या प्रकरणाचा उलगडा होणार आहे.

## तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये तीन कारखान्यांना भीषण आग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा औद्योगिक वसाहतीत भीषण आगीची घटना घडली. येथील तळोजा औद्योगिक वसाहतमधील तीन कारखान्यांना एकाच वेळी आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. रात्री साडेनऊच्या सुमारास लागलेली ही आग पहाटे साडेपाच वाजेपर्यंत आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाला शर्थीचे प्रयत्न करावे लागले. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी कारखान्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

तळोजा औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्रमांक बी-४२ वरील विघ्नहर्ता कंपनीमध्ये अगरबत्ती निर्मितीसाठी वापरल्या जाणार्या रसायनांची सुमारे १५० पिंपे साठवण्यात आली होती. या पिंपांमधील सॉल्व्हन्ट रसायनांनी अचानक पेट घेतल्याने भीषण स्फोट झाले आणि आगीने उग्र स्वरूप धारण केले. स्फोटाच्या तीव्रतेमुळे कारखान्यातील लोखंडी पत्रे तुटून थेट रस्त्यावर कोसळली. उडालेल्या रसायनांमुळे कंपनीसमोरील रस्ता व गटारांमधून आग पसरत गेली आणि लगतच्या आणखी बी - ४१ आणि बी - ४३ या दोन कारखान्यांनाही तिचा फटका बसला.

आगीचे लोण वाढत असल्याचे लक्षात येताच कारखान्यातील कामगारांनी प्रसंगावधान राखत तात्काळ बाहेर पळ काढला आणि आपले प्राण वाचवले. तळोजा एमआयडीसी अग्निशमन दलाचे अधिकारी रत्नाकर पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, रात्री सव्वा दहा वाजता आगीची माहिती मिळताच वाहतूक कोंडी असूनही अवघ्या पाच मिनिटांत अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. आगीची तीव्रता पाहता अतिरिक्त बंब मागवण्यात आले.

पहाटेपर्यंत सतत पाणी व फोमचा मारा करून अखेर आग नियंत्रणात आणण्यात यश आले. मात्र, रसायनांनी पेट घेतल्यामुळे आग अधिक पसरली असली तरी तिचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेनंतर औद्योगिक वसाहतीतील सुरक्षा व्यवस्था व रसायन साठवणीबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.



### अटकपूर्व जामीनही फेटाळला; महाड हिंसाचार प्रकरण चिघळलं

# विकास गोगावले अद्याप फरार

**दै.रायगड नगरी । महाड**

महाड नगरपरिषद निवडणुकीदरम्यान झालेल्या मारहाण प्रकरणात राज्याचे मंत्री भरत गोगावले यांचे सुपुत्र विकास गोगावले यांना मोठा धक्का बसला आहे. या प्रकरणात विकास गोगावले यांनी दाखल केलेला अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला असून, त्यामुळे त्यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. मतदानाच्या दिवशी घडलेल्या हिंसाचारामुळे आधीच राजकीय वातावरण तापलेले असताना, आता न्यायालयाच्या या निर्णयामुळे संपूर्ण रायगड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही दोन वेगवेगळ्या न्यायालयांनी विकास गोगावले यांना दिलासा देण्यास नकार दिला होता.



महाड नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान सुरू असताना प्रभाग क्रमांक २ मध्ये तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. याच दरम्यान शिंदे गटाचे पदाधिकारी आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या मारहाणीत राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांवर हल्ला केल्याचा आरोप विकास गोगावले आणि त्यांच्या समर्थकांवर करण्यात आला आहे. या घटनेनंतर महाड पोलिस ठाण्यात विकास गोगावले यांच्यासह एकूण २९ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, गुन्हा दाखल होताच सर्व आरोपी भूमीगत झाले आणि आजपर्यंत ते पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत.

या प्रकरणात विकास गोगावले यांनी अटक टाळण्यासाठी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता. माणगाव न्यायालयात त्यांनी दोन वेळा अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला, मात्र दोन्ही वेळा न्यायालयाने त्यांचा अर्ज फेटाळला. त्यानंतर त्यांनी मुंबई न्यायालयातही धाव घेतली, परंतु तिथेही त्यांना दिलासा मिळाला नाही. सलग तिसऱ्यांदा जामीन नाकारण्यात आल्याने विकास गोगावले यांच्यावर अटकेची टांगती तलवार कायम आहे. गेल्या २४ दिवसांपासून ते फरार असल्याची माहिती असून, पोलिसांकडून त्यांचा कसून शोध सुरू आहे. याच प्रकरणातील राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी नाना जगताप हेदेखील अद्याप फरार असल्याचं समोर आलं आहे.

या संपूर्ण प्रकरणामागे राजकीय वर्चस्वाची लढाई असल्याची चर्चा रंगली आहे. महाड नगरपालिका निवडणुकीदरम्यान विकास गोगावले आणि सुशांत जाबरे समर्थकांमध्ये मोठ्या प्रमाणावर संघर्ष झाला होता.

या राड्यानंतर दोन्ही बाजूंनी एकमेकांविरोधात परस्पर तक्रारी दाखल करण्यात आल्या. मात्र न्यायालयाने आरोपींच्या अटकपूर्व जामीन अर्जाना नकार दिल्यानंतर, संबंधित सर्व आरोपी भूमीगत झाल्याचं चित्र आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनावरही आरोपींना अटक करण्याचं मोठं आव्हान उभं राहिलं आहे.

## मुलगी नको म्हणून आईकडूनच पोटच्या गोळ्याची हत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली उपनगरात माणुसकीला काळीमा फासणारी धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. जन्मदात्या आईनेच सहा वर्षांच्या चिमुरडीचा गुदमरून खून केल्याचा प्रकार कळंबोलीतील सेक्टर १ मधील गुरूसंकल्प हाऊसिंग सोसायटीत समोर आला. मुलगी नको होती, ती व्यवस्थित बोलत नव्हती आणि हिंदी भाषेत बोलत असल्याने त्रास होत होता, अशा अत्यंत क्षुल्लक कारणांवरून या निर्दयी आईने आपल्या लेकीचा जीव घेतल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले आहे.

कळंबोलीत राहणारी सुप्रिया प्रमोद म्हामुनकर (वय ३० वर्षे) हिला पहिलं अपत्य मुलगी झाल्यापासून ती असमाधानी होती. मुलगी नको असल्याची भावना तिच्या मनात खोलवर रुजली होती. या कारणावरून ती मुलीशी वारंवार तिरस्काराने वागत असल्याची माहिती पोलिस तपासात समोर आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनेच्या दिवशी घरात कोणीही नसताना सुप्रियाने आपल्या सहा वर्षांच्या मुलीचे नाक व तोंड दाबून श्वास रोखला, तसेच मऊ व बोथट वस्तूने तिच्या ओटीपोटावर दाब देऊन तिची हत्या केली. प्राथमिक तपासात हा खून पूर्वनियोजित नसला, तरी दीर्घकाळ मनात असलेल्या द्वेषातूनच हा अमानुष कृत्य केल्याचे स्पष्ट झाले आहे. घटनेची माहिती मिळताच कळंबोली पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला. चौकशीअंती आरोपी सुप्रिया म्हामुनकर हिला अटक करण्यात आली आहे.

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला ‘दिबां’च्या नावासाठी कृती समिति ठाम : लोकनेते रामशेठ ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अधिकृतपणे सुरू झाल्यानंतर या विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे ही सर्वपक्षीय कृती समितीची ठाम भूमिका असल्याचे समितीचे उपाध्यक्ष, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्पष्ट केले आहे.

येथील विमानतळावरून पहिले प्रवासी विमान उड्डाण झाल्याच्या पार्श्वभूमीवर प्रतिक्रिया देताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, लोकनेते दि.बा. पाटील यांनी या परिसरातील स्थानिक भूमिपुत्रांची अस्मिता जागृत ठेवण्यासाठी आणि त्यांचे हक्क अबाधित राहावेत यासाठी शेवटपर्यंत संघर्ष केला. त्यांच्या या योगदानाची ओळख म्हणून या विमानतळाला ‘दिबा’साहेबांचेच नाव दिले पाहिजे ही आमची ठाम आणि रास्त मागणी आहे.



या मागणीसाठी सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने तसेच स्थानिक भूमिपुत्रांच्या पुढाकारातून यापूर्वी विविध आंदोलने करण्यात आली. या आंदोलनांमुळे आमच्यावर अनेक केसेस झाल्या. गेल्याच महिन्यात या केससाठी मी आणि दशरथदादा पाटील यांच्यासह भूमिपुत्र उरणच्या कोर्टात हजर होतो. या संदर्भात आम्हाला जामीन घेण्याची ही वेळ आली तरीही आम्ही मागे हटलेलो नाही. ‘दिबा’साहेबांच्या नावासाठी आमचा पाठपुरावा अखंड सुरू आहे.

कृती समितीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट आश्वासन दिले आहे की, या विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचेच नाव दिले जाईल. कालही त्यांनी पुन्हा एकदा आपली भूमिका ठामपणे मांडत लवकरच नामकरणाचा निर्णय होईल आणि विमानतळाला ‘दिबा’साहेबांचे नाव दिले जाईल, असे सांगितले आहे. त्यामुळे आम्हाला पूर्ण विश्वास आहे की, ‘दिबा’साहेबांचे नाव या विमानतळाला लवकरच मिळेल, असा विश्वास लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केला.

आपल्या खासदारकीच्या काळातील आठवणी सांगताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, मी खासदार असताना सिडकोचे अधिकारी या प्रकल्पासंदर्भात मला भेटत होते. १९९८-९९पासून गेली तब्बल २५ वर्षे या विमानतळासाठी प्रयत्न सुरू होते, मात्र दीर्घकाळ प्रकल्पाला अपेक्षित गती मिळत नव्हती. नंतरच्या काळात फडणवीस सरकारच्या कार्यकाळात या विमानतळाला खर्या अर्थाने गती मिळाली आणि आज ते प्रत्यक्षात सुरू झाले आहे.

विमानतळ सुरू झाल्यामुळे या संपूर्ण विभागात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होणार असून उद्योग, व्यापार आणि आर्थिक विकासाला नवे बळ मिळेल. हे विमानतळ केवळ वाहतुकीचे केंद्रबिंदू नसून नवी मुंबई व रायगड जिल्ह्याच्या विकासाचा नवा अध्याय ठरणार आहे.

### अन्न व औषध प्रशासनासह पोलिसांचे देखील दुर्लक्ष

## श्रीवर्धन शहरासह संपूर्ण तालुक्यात गुटख्याची विक्री सुरूच

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन शहरासह संपूर्ण तालुक्यामध्ये गुटख्याची अवैध विक्री जोरदारपणे पुन्हा एकदा सुरू झाली आहे. मात्र गुटखा या पदार्थावर महाराष्ट्र राज्यात बंदी असताना सुद्धा त्याची खुलेआम विक्री होत असून देखील अन्न व औषध प्रशासन व पोलीस प्रशासन या गोष्टीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत असल्याचे पाहायला मिळत आहे. रायगडच्या पोलीस अधीक्षक पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर नवनियुक्त पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी अवैध धंदे करणाऱ्यांचे चांगलेच कंबरडे मोडले होते. परंतु आता काही दिवस उलटून गेल्यानंतर श्रीवर्धन तालुक्यामध्ये पुन्हा एकदा गुटख्याची जोरदार विक्री सुरू झाली आहे.

काही दिवसापूर्वी श्रीवर्धन पोलिसांनी एका गुटखा विक्रेत्यावरती धाड टाकून अंदाजे ९८ हजार रुपयाचा गुटखा जप्त केला होता. त्यानंतर श्रीवर्धन शहरात व तालुक्यामध्ये गुटखा विक्री अनेक दिवस बंद होती. परंतु पुन्हा एकदा गुटखा विक्री जोरात सुरू झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. अवैध गुटखा विक्री करणारे सध्या ट्रॅव्हल्स बसेस किंवा ट्रान्सपोर्ट घेऊन येणाऱ्या मालट्रक मधुन गुटखा मागवत असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. सदरचा गुटखा शहराच्या बाहेर जाऊन ताब्यात घेतल्यानंतर रात्रीच्या वेळी व पहाटे लवकर सर्व विक्रेत्यांना पुरविला जातो. अशी देखील माहिती उपलब्ध झाली आहे.

गुटखा सर्रासपणे सर्वत्र मिळू लागल्यामुळे अनेक महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थी देखील या गुटख्याच्या व्यसनाधीन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी सदर गुटखा विक्री करणाऱ्यांवरती कडक कारवाई करावी. अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

# हार्मनी फाउंडेशनच्या उपक्रमाला नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांची भेट

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील महिलांच्या आरोग्या विषयी असणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी येथील कोतवाल रोड याठिकाणी हेल्थ केअर सेंटर मध्ये हार्मनी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांना माफक दरात आजारांवर औषधोपचार मिळणार आहेत.

या स्तुत्य उपक्रमाला विद्यमान नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी भेट देऊन हार्मनी फाउंडेशनचे संचालक नितीन कांदळगावकर,संचालिका नम्रता कांदळगावकर आणि संचालक सुभाष भोसले यांचे विशेष कौतुक केले.



तसेच डॉ. रोजीना काझी यांना नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

माथेरान सारख्या दुर्गम भागात सुसज्ज वैद्यकीय सुविधा उपलब्ध नाही त्यामुळे महिलांना उद्भवणाऱ्या आजारांचे निराकरण करण्यासाठी हार्मनी फाउंडेशनने स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाला नगरपरिषदेच्या माध्यमातून जे काही सहकार्य अपेक्षित असेल ते निश्चितपणे केले जाईल असे आश्वासन यावेळी नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी दिले आहे.

यावेळी हार्मनी फाउंडेशनचे संचालक नितीन कांदळगावकर,संचालिका नम्रता कांदळगावकर,संचालक सुभाष भोसले,वनसमिती अध्यक्ष योगेश जाधव, निखिल शिंदे, नगरसेवक गौरंग वाघेला, डॉ. प्रशांत यादव तसेच अन्य ग्रामस्थ उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल संताजी कृष्णा परदेशी व धनाजी कृष्णा परदेशी, रा.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड यांचे वडिलोपार्जित मालकीची, कुळवहिवाटीची व ताबेकब्जातील खालील वर्णनाची शेतजमीन आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार |
|---|---|---|---|---|
| चिरनेर, ता.उरण, जि.रायगड | १६० | २ | ०.९९.००<br>पो.ख. ०.०३.००<br>एकूण १.०२.०० | १६ रु. २५ पैसे |

येणेप्रमाणे मिळकत असून सदरहू मिळकती आमच्या अशिलांच्या कायदेशीर मालकीच्या हक्क व अधिकाराच्या असून सदरहू मिळकतीचा ताबेकब्जा आमचे अशिलांचा आहे. तरी सदरहू मिळकती संदर्भात कोणीही, विक्री, दान, गहाण, साठेकरार, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, विकासाचा करार अशा स्वरुपाचे कोणतेही व्यवहार व दस्त करू नये. या उपरहरी कोणीही वरील प्रकारचा व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिलांच्या मालकी हक्क व अधिकारावर बंधनकारक राहणार नाही, कळावे.

दि.२६/१२/२०२५
ठिकाण : पनवेल

सही/–
**ॲड.समीर विजय पाटील**
**पायोनिअर को.ऑप.हौ.सोसा. ए विंग, पहिला मजला, फ्लॅट नं.१०४, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६**
**मो.नं.८६५५७६२०५८**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी मौजे : आतोणे, ता.सुधागड, जि.रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत सदर मिळकतीचे मालक सपना संतोष ओसवाल, पत्ता : रा.बाजारपेठ, पाली, ता.सुधागड, जि.रायगड ४१०२०५ यांच्या ताबेकब्जातील असलेली जमीन आमचे अशिल श्री.एकनाथ विठ्ठल भालेकर, रा.चेरिवली, पो.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ यांनी कायमस्वरुपी खरेदीखताने घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | पोटखराबा हे.आर.पॉ. | एकूण हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २४४ | ०–२५–०० | ०–०६–०० | ०–३१–०० | ०.१७ |

ज्याअर्थी वर नमूद मिळकतींमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु, हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारे कोणत्याही हर–हरकत असल्यास अशा हितसंबंधित व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आमच्या खालील पत्यावर सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील सदर मिळकतीचे मालक सपना संतोष ओसवाल यांचे मालकी हक्क–हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, याची तमाम संबंधितांनी नोंद घ्यावी.

दि.२६/१२/२०२५

सही/–
**ॲड.ज्योत्स्ना हरिश्चंद्र भालेकर**
**मु.चेरिवली, पो.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६**
**मो.नं.९७६९०६२६२८**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमुद केलेली मिळकत ही श्रीमती. जयश्री रविंद्र शेळके व इतर ३ यांचे नांवे आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | एकूण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| श्रीमती.जयश्री रवींद्र शेळके व इतर ३ | २७/१ | ०–३२–१०<br>पो.ख. ०–०२–८०<br>एकूण क्षेत्र ०–३४–९०<br>यापैकी विक्री क्षेत्र ०–२१–० हे.आर. | ४.१९ |

मौजे तळोजे मजकुर, ता. पनवेल, जि. रायगड येथील वर नमुद मिळकतीचे जमिन मालक ७/१२ मधील नमुद कब्जेदार श्रीमती. जयश्री रविंद्र शेळके व इतर ३ यांची वरील नमुद जमिन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमुद केलेल्या जमीनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तिच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द झाले पासून २१ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे. असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदाराबरोबर ठरविलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : पनवेल
दि.२७/१२/२०२५

सही/–
**ॲड.गणेश एन. भोगाडे**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**शॉप नं.६, जानकी बिल्डींग, प्लॉट नं.५०/२४, नित्यानंद रोड, कॉंग्रेस भवन समोर, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९३२४७२७४४६**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी मौजे : आतोणे, ता.सुधागड, जि.रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत सदर मिळकतीचे मालक श्री.सचिन शंकर मोहिते व इतर २ वगैरे, सर्व रा.१६/४/१/१, प्लॉट नं.७, नियर वर्ल्ड सोसायटी, वाळेवाडी, पुणे, महाराष्ट्र–४११०४५ यांच्या ताबेकब्जा असलेली जमीन आमचे अशिल श्री.रमेश राघो भेंडे, रा.दुंदरे रोड, राम मंदिर जवळ, चिंचवली, वाजे, पनवेल, रायगड–४१०२०६ यांनी कायमस्वरुपी खरेदीखताने घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | पोटखराबा हे.आर.पॉ. | एकूण हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २२७ | ०–१८–०० | ०–१४–०० | ०–३२–०० | ०.०६ |
| २ | २४० | १–४८–२० | ०–२९–९० | १–७८–१० | २.७५ |
| ३ | २४१ | ०–२३–९० | ०–०५–१० | ०–२९–०० | ०.९५ |
| ४ | २४२ | ०–२४–०० | ०–०५–०० | ०–२९–०० | ०.९५ |

ज्याअर्थी वर नमूद मिळकतींमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु, हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारे कोणत्याही हर–हरकत असल्यास अशा हितसंबंधित व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आमच्या खालील पत्यावर सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील सदर मिळकतीचे मालक श्री.सचिन शंकर मोहिते व इतर २ वगैरे यांचे मालकी हक्क–हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, याची तमाम संबंधितांनी नोंद घ्यावी.

दि.२६/१२/२०२५

सही/–
**ॲड.ज्योत्स्ना हरिश्चंद्र भालेकर**
**मु.चेरिवली, पो.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६**
**मो.नं.९७६९०६२६२८**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे : कोपर, ता.पेण, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या जमिनीचे सर्व मालकी हक्क माझे अशिल श्री.सुजित प्रभाकर पाटील, रा.नेरुळ, नवी मुंबई यांनी जमीन मिळकतीच्या मालकाकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर वर्णन व विद्यमान कब्जेदारांची नावे खालीलप्रमाणेः–

**वर्णन**
मौजे : कोपर (५५३८७२), ता.पेण, जि.रायगड
PU-ID : 30081249296 खाता क्रं.१०२३

| भोगवटादाराचे नांव | सर्व्हे क्रं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ | आकारणी रु.पै. | भोगवटादार |
|---|---|---|---|---|---|
| अजित विठोबा पाटील<br>किर्ती विठोबा पाटील<br>चंद्रभागा विठोबा पाटील<br>जितेश विठोबा पाटील<br>विजग विठोबा पाटील | ३७ | ४<br><br>एकूण | ०–२४–२०<br>०–०४–६०<br>०–२८–८० | २.६२ | वर्ग १ |

वरील मिळकत ही एकूण ०–२८–८० क्षेत्रापैकी भोगवटादार

श्री.अजित विठोबा पाटील वगैरे ५ यांच्या नावे आणि मालकीची असलेली जमीन माझे मालकीची असलेली परवानगी मिळवून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचाही गहाण, दान, बोजा, बक्षिस, साठेकरार, फरोक्त, ट्रस्टी, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट व तत्सम कोणत्याही प्रकारचे दस्ताने, कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत आहे, असे समजण्यात येवून सदरहू मिळकती संदर्भात माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.२७/१२/२०२५

सही/–
**ॲड.श्री.प्रसाद एन. पाटील**
**ए–विंग, ४०३, तुलसी सोनाटा, चॅनल उपवन जवळ, साईनगर (प.), पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६**
**मो.क्रं. ९७०२०८२६६९**


# आगामी जि.प.पं.स.निवडणुकीत शिवसेनाच बाजी मारणार : प्रमोद घोसाळकर

**दै.रायगड नगरी । तळा**

रायगड जिल्ह्यातील नगर परिषद आणि नगराध्यक्षपदांच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाला घवघवीत यश मिळाल्यामुळे आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिंदे सेनेच्या रायगड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास दुणावल्याचे चित्र आहे.रायगड जिल्ह्यात १० नगर परिषदेच्या निवडणूका पार पडल्या यामध्ये शिवसेना शिंदे गटाचे ३ थेट नगराध्यक्ष व ५७ नगरसेवक निवडून आले आहेत.यामध्ये खोपोली नगरपरिषदेत थेट नगराध्यक्ष आणि १४ नगरसेवक निवडून आले आहेत,माथेरान थेट नगराध्यक्ष १२ नगरसेवक,महाड थेट नगराध्यक्ष ८ नगरसेवक,मुरूड ११ नगरसेवक,कर्जत ७ नगरसेवक,श्रीवर्धन ३ नगरसेवक,रोहा आणि पेण प्रत्येकी १ असे एकूण ५७ नगरसेवक निवडून आले आहेत. शिंदे सेनेच्या कार्यकर्त्यांनी तळा शिवसेना शाखेत पेढे वाटून जल्लोष केला.

शिवसेना (एकनाथ शिंदे गट) ची तळा तालुका आढावा बैठक दि.२४ डिसेंबर रोजी तळा येथे उत्साहात पार पडली. जिल्हा परिषद पंचायत समिती आगामी निवडणुकांसाठी पक्ष यंत्रणा संपूर्ण ताकदीने उतरविण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर यांनी या बैठकीत उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना स्पष्ट केले की, जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक ही प्रतिष्ठेची लढाई आहे. प्रत्येक गट आणि गणातील जास्तीत जास्त सदय निवडून आणण्याची जबाबदारी ही संबंधित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची असेल. गटबाजी विसरून केवळ शिवसेनेच्या उमेदवाराचा विजय हेच ध्येय ठेवा, असे निर्देश त्यांनी दिले. या बैठकीला युवासेना उपजिल्हाप्रमुख भास्कर गोळे, तालुका प्रमुख प्रदूम्न ठसाळ,शहर प्रमुख राकेशशेठ वडके, जिल्हा कोअर कमिटी सदस्य लिलाधर खातू,नगरसेवक नरेश सुर्वे,मंगेश पोळेकर,सिराज खाचे,रितेश मुंढे,कैलास पायगुडे, नमित पांढरकामे, तमाम शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

घोसाळकर पुढे म्हणाले की,श्रीवर्धन मतदार संघात देखील राज्याचे फलोत्पादन रोजगार हमी खारभूमी विकासमंत्री ना.भरतशेठ गोगावले यांच्या नेतृत्वावर येथील जनतेचा दृढ विश्वास निर्माण झाला असून म्हसळा नगरपंचायत नगराध्यक्ष आणि नगरसेवक यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश करून त्याची प्रचिती दिली आहे.जिल्ह्यात भरतशेठ यांच्या वाढत्या लोकप्रियतेने आज तळा तालुक्यात देखील नवचैतन्य निर्माण झाले आहे आहे.गेली ३५ वर्षे राष्ट्रवादी कॉंग्रेसची सत्ता असून देखील बेरोजगारी वाढली आहे, स्थलांतरमध्ये मोठी वाढ झाली आहे,शाळा बंद पडत आहेत,भ्रष्टाचार फोफावला आहे,हुकूमशाही वाढली आहे निकृष्ट दर्जाची विकासकामे होत आहेत याविरोधात आता जनता जागृत झाली असून श्रीवर्धन नगर परिषदेत राष्ट्रवादी कॉंग्रेसचा पराभव करून जनतेने तटकरे कुटुंबीयांचे नाक कापले आहे .या मतदार संघात आता परिवर्तन अटळ असून शिवसैनिकांनी जनतेची कामे पक्ष संघटना मजबूत करण्यावर भर द्यावा काही दिवसात गोगावले यांच्या नेतृत्वाखाली येथील शासकीय कामांचा आढावा घेतला जाईल असे त्यांनी यावेळी सांगितले.




## जाहीर नोटीस

तमाम जनतेस हया जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुशिलकुमार व्ही. शिंदे व सौ. वैशाळी एस. शिंदे हयांचेकडुन आमच्या आशिलांनी कायम खरेदीने घेण्याचे ठरविले आहे. सबब सदर मिळकतीच्या मालकी हक्काची खात्री करून घेण्यासाठी हि जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

**सदनिका क्र. ३०२, तिसरा मजला, बिल्डींग क्र. ए–४, लक्ष्मी नगर इन दावडा इस्टेट, सर्व्हे नं. १६/२/२ब, १६/२/७,१६/२/३/१, मौजे विहीघर, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड**

वर नमुद केलेल्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करण्याबाबतचा करार, वारसहक्क, वहिवाट हक्क, ताबा हक्क, भाडेपटटा, मृत्युपत्र, पोटगी, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीमधील नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर प्रत्यक्ष येवुन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क, हितसंबंध नाहीत अथवा असल्यास त्यांनी ते सोडुन दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असा गृहीत धरून, आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हयांची नोद घ्यावी

दि.२६/१२/२०२५

सही/–
**ॲड.गणेश हरिश्चंद्र शेलार**
**ॲडव्होकेट हायकोर्ट (बी.एससी.एलएल.बी.)**
**घर नं. १०९१, कोळेश्वर मंदीराजवळ, कोळीवाडा, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र ४१०२०६.**
**मो.नं. ९५९४०६२५०२**

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या नोटीसीद्वारे जाहिर सुचना देण्यात येते की, १. श्रीमती साधना अकुंश पाटील २. कै. किसन उर्फ कृष्णा जोमा केणी मयत यांचे वारस २.१) बाळीबाई किसन उर्फ कृष्णा केणी २.२) श्री. रोहीदास किसन उर्फ कृष्णा केणी २.३) श्रीमती मीना अनंत भोईर २.४) श्री दिलीप किसन उर्फ कृष्णा केणी २.५) श्रीमती सविता व्दारकेश पाटील २.६) श्री. भुपेंन्द्र किसन उर्फ कृष्णा केणी सर्व राहणार चिंचपाडा, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६, यांना सिडको लि. कडून मौजे नोड पुष्पक वहाळ, येथील फाईल नं CHIM-OCOGD-M5+M6+M15 प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भुखंडांचे वाटप झालेले आहे. सदर भुखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादित जमिनीच्या मोबदल्यात पुनवर्सन व पूनास्थापना योजने अंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबई, कडून खालीलप्रमाणे पात्रता मंजुर होऊन करारनामा झाला आहे वर नमूद भूखंडधारकाकडून याच्या कडून माझे अशिल १. श्री. समीर लक्ष्मण कास्कर २ सुरज पंढरीनाथ केणी ३. श्री वरूण जगदीश केणी ४. श्री. भुपेंन्द्र किसण केणी पत्ता चिंचपाडा, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ यांनी खाली वर्णन केलेला भूखंडापैकी ५०% अविभाज्य भाग भूखंड विकसीत करारनामा व त्रिपक्षीय करारनामा हस्तांतरण करण्याचे, तसेच भूखंड विकसीत करण्याकरिता विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रं.** CHIM-OCOGD-M5+M6+M15

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक वहाळ | २५ ए | ४९१ डी | ८०० चौ.मी पैकी ५०% अविभाज्य भाग |

वर वर्णन केलेल्या मिळकती मध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी त्यानंतर येणा–या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल सदर सुचना प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

दि.२६/१२/२०२५

सही/–
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**शॉप नं.४५, पहिला मजला, क्रिस्टल प्लाझा, सेक्टर ७, हिरानंदानी, खारघर, नवी मुंबई–४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

अर्जदारातर्फे वकील
सौ. निलम लक्ष्मण पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१५५६/२०२५
नि.नं.८
ने.ता.२२/०१/२०२६

१) श्रीमती.धर्मुबाई पांडुरंग पाटील
वय : ७२ वर्षे, धंदा : घरकाम
२) श्री.प्रवीण पांडुरंग पाटील
वय : ३९ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.सतीश पांडुरंग पाटील
वय : ३६ वर्षे, धंदा : नोकरी
अर्जदार नं.१ ते ३ रा.कुंडेगाव, नवघर
जेएनपीटी उरण, ता.उरण, जि.रायगड
४) सौ.वनिता हरेश मढवी
वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कुंडेगाव, ता.उरण, जि.रायगड
५) सौ.कल्पिता किशोर घरत
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.किशोर मधुकर घरत, ९५ क,
सागमळा चौळ, रायगड ... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही ... सामनेवाले

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार नं. १ या अर्जदार नं २ ते ५ यांची आई असून अर्जदार नं २ ते ५ हे एकमेकांचे सख्खे भाऊ–बहिण आहेत. सदर अर्जदार नं १ यांचे पती म्हणजेच अर्जदार नं. २ ते ५ यांचे वडिल पांडुरंग कोलश्या उर्फ कोळशा पाटील उर्फ कोळी हे दि.१४/०८/२०१९ रोजी मौजे : कुंडेगाव, पो.जेएनपीटी, ता.उरण येथे मयत झालेले आहेत. तसेच कै.पांडुरंग कोलश्या उर्फ कोळशा पाटील उर्फ कोळी यांची आई म्हणजेच अर्जदार क्र.१ यांची सासू व अर्जदार नं.२ ते ५ यांची आजी बामूबाई कोळश्या पाटील या देखील मयत झालेल्या आहेत. सदर मयत पांडुरंग कोलश्या उर्फ कोळशा पाटील उर्फ कोळी यांच्या सामाईक मालकीच्या मौजे : पागोटे व नवघर, ता.उरण, जि.रायगड येथील जमीन मिळकती महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी ''नवी मुंबई'' प्रकल्पाकरिता संपादित केल्या आहेत. सदर मिळकतींच्या संपादनासंबंधी खालीलप्रमाणे ॲवॉर्ड जाहीर करण्यात आले आहे.

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे पागोटे व नवघर, ता.उरण, जि. रायगड येथिल**

| अ.क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | पागोटे २५९ | ५७ | २ | ०–१५–० | २.१९ |
| | | ६१ | ५ अ | ०–२२–४ | २.८८ |
| | | ८४ | २ | ०–१२–८ | १.८१ |
| २ | नवघर १८७/८५ | १६१ | १ | ०–५–७ | ०.६९ |
| | | १७९ | ४ बी | ०–१४–५ | २.०७ |
| | | १८१ | ४ | ०–१४–० | १.९९ |
| | | १९३ | ७ | ०–१५–९ | १.५० |
| | | १९७ | ८ | ०–९–० | १.३१ |
| | | २०९ | ५ | ०–१८–० | २.४४ |
| | | २१५ | १ | ०–९–९ | १.१२ |
| | | २२३ | २ | ०–१६–६ | २.३१ |
| | | २२३ | ८ | ०–१७–५ | २.२५ |
| | | २३३ | ६ | ०–६–३ | ०.८७ |
| | | २८१ | १० | ०–२–५ | ०.३७ |

वर नमूद संपादीत मिळकतींचे संपादनापोटी अर्जदार व त्यांचे इतर सहहिस्सेदारांस मौजे द्रोणागिरी, ता. उरण येथिल सेक्टर–६५ मधील भुखंड क्र. ५, हा १५५० चौ.मी. क्षेत्राचा भुखंड वाटप करण्यात आलेले आहे

आता शासनाने जाहीर केलेल्या साडेबारा टक्के भुखंड योजनेअंतर्गत सदर मयत पांडुरंग कोलश्या उर्फ कोळशा पाटील उर्फ कोळी यांस त्यांच्या वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारे भूखंड सदर अर्जदारांस मिळणेकरिता त्यांनी ते मयत पांडुरंग कोलश्या उर्फ कोळशा पाटील उर्फ कोळी यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे. कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानीशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे. कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२२ माहे १२ सन २०२५ रोजी माझ्या सहीने व मे. कोर्टाचे शिक्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

परिषदेच्या राज्यस्तरीय आदर्श जिल्हा आणि तालुका पत्रकार संघ पुरस्कारांची घोषणा

# पनवेल महानगर प्रेस क्लबला अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा 'वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ' पुरस्कार जाहीर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने दरवर्षी देण्यात येणाऱ्या पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ आणि वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये परभणी जिल्हा मराठी पत्रकार संघाला २०२५ चा आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार तर पनवेल महानगर प्रेस क्लबला वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.




अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जिल्हा आणि तालुका पत्रकार संघांना दरवर्षी पुरस्कारांनी गौरविले जाते. आठ महसूल विभागातून प्रत्येकी एका तालुका संघाची निवड केली जाते. यावेळी विशेष बाब म्हणून विदर्भातून दोन तालुका संघांना तसेच मुंबई उपनगरांतून एका पत्रकार संघाला सन्मानित केले जाणार आहे. राज्यातील ३६ जिल्ह्यातून एका आदर्श जिल्हा संघाची निवड केली जाते.

सन्मानपत्र, मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्कारांचे स्वरूप असून दरवर्षी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येते. पुरस्कार वितरणाचा हा सोहळा अत्यंत दणदणीत होतो. राज्यभरातून किमान हजार पत्रकार या सोहळ्यासाठी उपस्थित असतात.. फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होईल अशी माहिती अ. भा. मराठी पत्रकार परिषदेच्या प्रसिद्धी पत्रकात देण्यात आली आहे. पुरस्कार प्राप्त सर्व तालुका पत्रकार संघाचे एस.एम.देशमुख, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर,विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, राज्य प्रसिध्दीप्रमूख संदीप कुलकर्णी यांनी अभिनंदन केले आहे.

# पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उत्पादन शुल्क, परिवहन व वाहतूक विभागाची बैठक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अनुषंगाने निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष व शांततेत पार पडावी यासाठी आज दिनांक २६ डिसेंबर महापालिका मुख्यालयात उत्पादन शुल्क, परिवहन विभाग व वाहतूक विभागाची बैठक घेण्यात आली. निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आलेल्या या बैठकित तीनही विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

आदर्श आचारसंहिताचे पालन करताना निवडणूक रॅली, प्रचार मिरवणुकीदरम्यान वाहनांना ना हरकत प्रमाणपत्र देण्याविषयीच्या सूचना परिवहन विभागास देण्यात आल्या. प्रचार रॅलीचे मार्गाविषयी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांशी चर्चा करून माहिती करून घेणे, वाहनांच्या कागदपत्रांची तपासणी करणे, तपासणी नाक्यावरती संशयास्पद वाहनांची असून चौकशी करण्याबाबत या बैठकीत सूचना देण्यात आल्या. उत्पादन शुल्क विभागास भरारी पथकांच्या साह्याने चेकपोस्ट नाक्यांवरती बनावट दारू, अवैध वस्तू यांच्यावर कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. पथकांच्या साह्याने आदर्श आचारसंहिताचे पालन करताना विविध तक्रारींचे तात्काळ निवारण करण्याविषयी सूचना दिल्या. तसेच प्रभाग निहाय भरारी पथकाच्या माध्यमातून कारवाई करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. पोलीस वाहतूक विभागास सूचना देताना सहा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाजवळील वाहतूक कोंडीची ठिकाणे शोधून वाहतूक कोंडी होणार नाही यादृष्टीने बॅरिकेटिंग करणे, पार्किंगचे नियोजन करण्याविषयक सूचना देण्यात आल्या. सर्व विभागांच्या नोडल अधिकाऱ्यांना एकमेकांच्या संपर्कात राहून नियोजनपूर्वक काम करण्याविषयी सांगितले. एक खिडकी योजनेबाबत माहिती देताना शासनाच्या संबंधित विभागाच्या प्रत्येकी एका प्रतिनिधीने प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत सूचना दिल्या. निवडणूकविषयक सर्व कामे जसे की सर्व प्रकारची माहिती, परवाना देणे, प्रमाणपत्र तात्काळ एक खिडकीच्या माध्यमातून देण्याविषयीच्या सूचना या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. पनवेल महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, निवडणूक विभागाचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी यावेळी उपस्थित संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन व सूचना दिल्या.

# निजामपूर विभागात राष्ट्रवादीला खिंडार ; शिवसेनेत प्रवेश




**दै.रायगड नगरी । माणगाव**

निजामपूर विभागातील कांदळगाव खुर्द, चांदे आदिवासी वाडी, निजामपूर बौद्धवाडी, निजामपूर शहर व वीळे भाऊची आळी येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील असंख्य कार्यकर्ते व ग्रामस्थांनी विकास पुरुष ना.भरतशेठ गोगावले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत शिवसेना पक्षात जाहीर पक्षप्रवेश केला.

या पक्षप्रवेशात हरिश्चंद्र भेसळ, स्वप्नील अवघडे यांच्यासह संबंधित गावांतील संपूर्ण ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला रामराम ठोकत, शिवसेनेचा भगवा झेंडा हाती घेतला. आतापर्यंत या गावांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांकडून अपेक्षित विकास न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी होती.

याउलट, ना.भरतशेठ गोगावले यांच्या मतदारसंघातील वाढता विकासाचा वेग, ठोस कामे व लोकाभिमुख दृष्टिकोन पाहून आपल्या गावांचाही असा सर्वांगीण विकास व्हावा हा एकमेव उद्देश घेऊन ग्रामस्थांनी शिवसेनेत प्रवेश केला. यापूर्वीच ना. भरतशेठ गोगावले यांनी या परिसरात मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून पाणीपुरवठ्यासह विविध विकासकामे मार्गी लावली आहेत, याचा थेट लाभ ग्रामस्थांना मिळालेला आहे.

याप्रसंगी बोलताना ना. भरतशेठ गोगावले यांनी शिवसेनेत प्रवेश केलेल्या सर्व ग्रामस्थांचे मनःपूर्वक स्वागत केले. मंत्री किंवा आमदार या पदांपेक्षा मी तुमचा सेवेकरी म्हणून कायम उभा असेन.तसेच निजामपूर विभागाने मला विशेष साथ दिली असून, या विभागाच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव तत्पर राहीन. असं एकही गाव, वाडी किंवा वस्ती सापडणार नाही जिथे आमची विकासकामे पोहोचलेली नाहीत. माझ्यावर टीका करणाऱ्यांना मी केवळ आणि केवळ विकासकामांच्या माध्यमातूनच उत्तर देणार आहे.तसेच माझ्या संपूर्ण मतदारसंघातील एकही धार्मिक स्थळ विकासापासून वंचित राहणार नाही, असा मी शब्द देतो, असे म्हणाले.

या जाहीर पक्षप्रवेशामुळे निजामपूर विभागात शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक भक्कम झाली असून, येत्या काळात विभागाच्या विकासाला आणखी गती मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

याप्रसंगी निजामपूर शहर आणि निजामपूर विभागातील महिला अध्यक्षा आणि आदिवासी युवक अध्यक्ष व जेष्ठ पदाधिकारी तसेच माजी सरपंच राजाभाऊ रणपिसे, युवासेना उपजिल्हा प्रमुख अविनाश नलावडे, , गणेश समेळ, उप शहर प्रमुख नितीन बडे, युवा सेना शहर प्रमुख रफिक परदेशी, अच्युत तोंडलेकर, ज्येष्ठ नेते संदीप जाधव, माजी सरपंच गजानन मोहिते, सचिन मोरे, आदी शिवसेना युवासेना महिला आघाडी व निजामपूर विभागातील विविध सामाजिक कार्यकर्ते व महिला भगिनी उपस्थित होत्या.

# मयूर शेळके, अश्विन डिचोलकर शेकडो समर्थकांसह भाजपत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे खंबीर नेतृत्व, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विकासात्मक धोरण आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवत, नवीन पनवेल मधील प्रसिद्ध 'चिंतामणी मित्र मंडळा'चे अध्यक्ष मयूर शेळके आणि उपाध्यक्ष अश्विन डिचोलकर यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह भाजपचा झेंडा हाती घेतला आहे. या सर्व प्रवेश कर्त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षात स्वागत करत चिंतामणी मित्र मंडळाच्या पदाधिकारी आणि सदस्यांनी केलेल्या पक्षप्रवेशामुळे नवीन पनवेल परिसरात भाजपची संघटनात्मक ताकद अधिक वाढली आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनवेल परिसरात झालेल्या पायाभूत सुविधांच्या विकासामुळे अनेक सामाजिक कार्यकर्ते भाजपच्या विचारधारेकडे आकर्षित होत आहेत. याच पार्श्वभूमीवर, मयूर शेळके आणि अश्विन डिचोलकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसह भाजपमध्ये प्रवेश केला उरण मतदार संघाचे आमदार महेश बालदी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर, माजी नगरसेवक समीर ठाकूर, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, उपाध्यक्ष प्रीतम म्हात्रे, सरचिटणीस रुपेश नागवेकर, ज्येष्ठनेते अशोक शेळके यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी प्रवेशकर्त्यांचे पक्षाची शाल देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी नवनियुक्त कार्यकर्त्यांना भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आणि पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले. आगामी पनवेल महापालिका निवडणुकीच्या पार्श्ववभूमीवर राजकारणाच्या दृष्टीने हा पक्षप्रवेश अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. चिंतामणी मित्र मंडळाचा मोठा जनसंपर्क आणि तरुण कार्यकर्त्यांचे जाळे भाजपसाठी जमेची बाजू ठरणार आहे.



# उरण नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा भावना घाणेकर आणि महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी स्वीकारला पदभार

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा भावना घाणेकर आणि महाविकास आघाडीच्या जिंकून आलेल्या नगरसेवकांनी आज पदभार स्वीकारला. यावेळी आम्ही उरणच्या नागरिकांसाठी २४÷७ उपलब्ध राहू, आम्हाला भेटण्यासाठी कोणती अपॉइंटमेंट घ्यावी लागणार नाही तसेच लोकांसाठी आमचा जनता दरबारही राहील अशी माहिती नवनिर्वाचित नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी दिली.



त्या म्हणाल्या की, उरणच्या सुज्ञ नागरिकांनी मला आणि महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना जे भरघोस मताधिक्य दिले, त्याबद्दल मी जनतेचे मनःपूर्वक आभार मानते. आज या खुर्चीवर बसताना माझ्यावर उरणच्या जनतेच्या विश्वासाचे दडपण नक्कीच आहे. पण ही खुर्ची केवळ एसीमध्ये बसून राहण्यासाठी नसून ती जनतेच्या सेवेसाठी आहे. जनतेच्या समस्या थेट जाणून घेण्यासाठी मी दर १५ दिवसांनी एकदा 'जनता दरबार' घेणार आहे. लोकांमध्ये उतरून त्यांची सेवा करणे हेच माझे ध्येय असेल. कोणत्याही नागरिकाला आपल्या कामासाठी किंवा भेटीसाठी माझी 'अपॉइंटमेंट' घेण्याची गरज पडणार नाही; आमची दारे तुमच्या समस्या सोडवण्यासाठी सदैव उघडी असतील अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

आज मिळालेले हे यश म्हणजे सत्ताधाऱ्यांनी जनतेच्या गरजांकडे केलेले दुर्लक्ष आणि विकासकामांचा अभाव यांचाच परिणाम आहे. गेल्या १५ दिवसांत लोकांनी जे प्रेम आणि सहकार्य दिले ते माझ्यासाठी अत्यंत मोलाचे आहे. मी निवडून आलेल्या सर्व नगरसेवकांसह सर्वच लोकप्रतिनिधींना हेच सांगू इच्छिते की, नगरपरिषदेत पाऊल ठेवताना सर्व पक्षांचे झेंडे बाहेर ठेवा आणि आपण केवळ 'जनतेचे सेवक' आहोत, याचे भान ठेवून काम करा असे आवाहन त्यांनी केले. प्रचारादरम्यान आमचे नेते आदरणीय जितेंद्र आव्हाड साहेब, बाळ्या मामा आणि स्वर्गीय प्रशांत पाटील साहेब यांच्याबद्दल विरोधकांनी अत्यंत हीन दर्जाचे शब्द वापरून त्यांचा अपमान केला. यामुळे आमच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. असा अपमान मी मुळीच सहन करणार नाही आणि यापुढे उरणच्या कोणत्याही सुपुत्राला बोलण्याचे धाडस कोणी करणार नाही, याची खात्री मी आज देते अशा इशाराही त्यांनी विरोधकांना दिला.

या निवडणुकीत केवळ भूमिपुत्रांनीच नाही, तर सर्व समाजांनी आणि सर्वधर्मीयांनी मला साथ दिली आहे. मी 'सर्वधर्म समभाव' जपून सर्वांना समान सन्मान देण्याचे आणि कोणाबाबतही दुजाभाव न बाळगण्याचे आश्वासन देते तसेच आज आमची सत्ता राज्यात किंवा केंद्रात नसली, तरी मी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडे जाऊन उरणच्या विकासासाठी हक्काने निधी आणि मदत मागणार आहे. केंद्रातील प्रश्नांसाठी सुप्रिया ताई सुळे, डॉ. अमोल कोल्हे आणि बाळ्या मामा यांच्या माध्यमातून संसदेत आवाज उठवला जाईल असे त्यांनी सांगितले. विरोधकांनी कितीही वल्गना केल्या की आम्ही 'टाचणीभर' काम करू देणार नाही, तरी त्यांनी एक लक्षात ठेवावे की, आदरणीय शरद पवार साहेबांनी मला शब्द दिला आहे - कोणाच्या बापालाही घाबरायची गरज नाही, तुम्ही जनतेसाठी काम करा, आम्ही खंबीरपणे तुमच्या पाठीशी आहोत. पवार साहेबांचा शब्द दिल्लीचे तख्तदेखील पाळते, त्यामुळे उरणकरांच्या हितासाठी मी शेवटपर्यंत निष्ठेने काम करत राहीन असे आश्वासन त्यांनी दिले.

# 'मिशन लक्ष्यवेध' अंतर्गत क्रीडा प्रतिभा विकास केंद्रास शासनाची मान्यता

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्य शासनाने 'मिशन लक्ष्यवेध' या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत जिल्ह्यात क्रीडा प्रतिभा विकास केंद्र सुरू करण्यास मान्यता दिली आहे. या केंद्रामध्ये टेबल टेनिस, कुस्ती, बॅडमिंटन, थलेटिक्स आणि शूटिंग या पाच खेळांचा समावेश असणार आहे.

राज्यातील अधिकाधिक खेळाडूंनी ऑलिम्पिक तसेच जागतिक स्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊन पदके प्राप्त करावीत, या उद्देशाने शासनाने क्रीडा प्रशिक्षणासाठी त्रिस्तरीय रचना विकसित केली आहे. त्यामध्ये राज्यस्तरावर हाय परफॉर्मन्स सेंटर, विभागीय स्तरावर स्पोर्ट्स एक्सलन्स सेंटर आणि जिल्हास्तरावर क्रीडा प्रतिभा विकास केंद्र उभारण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून रायगड जिल्ह्यासाठी हे केंद्र सुरू होणार आहे.

या योजनेंतर्गत २० खेळाडूंची निवड करण्यात येणार असून हे केंद्र अनिवासी स्वरूपाचे असेल. निवडलेल्या खेळाडूंना तज्ज्ञ क्रीडा मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण देण्यात येणार असून मार्गदर्शकांना आकर्षक मानधन दिले जाणार आहे. यासोबतच अत्याधुनिक क्रीडा साहित्य, प्रत्येक खेळाडूस स्पोर्ट्स कीट, पूरक आहार, देशांतर्गत स्पर्धांमध्ये सहभागाचा खर्च, स्पोर्ट्स सायन्स सेंटर, वैद्यकीय उपचार व विमा खर्च, समुपदेशन केंद्र तसेच सराव व लीग स्पर्धांचे आयोजन अशा सर्व सुविधा पुरविण्यात येणार आहेत.

खेळाडूंची निवड प्रक्रिया देखील टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार आहे. जिल्हास्तरावर राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी किंवा पदक विजेते खेळाडू, विभागीय स्तरावर राष्ट्रीय स्तरावर सहभागी किंवा पदक विजेते खेळाडू, तर हाय परफॉर्मन्स सेंटरसाठी राष्ट्रीय स्तरावरील पदक विजेते व भारतीय संघासाठी संभाव्य खेळाडूंची निवड केली जाणार आहे.